पुणे, दिनांक :- ०४/०९/२०१९

## प्रेस नोट

दिनांक ०२/०९/२०१९ व वि. ०३/०९/२०१९ रोजी गणशोत्सवाचे अनुषगाने गुन्हे शाखेने पुणे शहरातील कासेवाडी, कामगार पुतळा, राजीव गांधी झोपडपट्टी, डायस प्लॉट, औद्योगिक वसाहत, महर्षिनगर झोपडपट्टी, जनता वसाहत, तुकाईनगर, लक्ष्मीनगर,येरवडा, म्हाडा कॉलनी, रामनगर, आनंदनगर, सुरक्षानगर, बिराजदार नगर, इंदिरानगर, वेताळबाबा इत्यादि झोपडपट्टयांमध्ये सांयकाळी १६.०० ते रात्री २०.०० वा. चे दरम्यान कोबिंग ऑपरेशन करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

कोबिंग ऑपरेशनमध्ये गुन्हेगार टोळीतील जेलमधून बाहेर आलेले गुन्हेगार, गत ०५ वर्षामध्ये एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आलेले गुन्हेगार, मोका कायदयान्वये कारवाई करण्यात आलेले गुन्हेगार, मागील दोन वर्षामध्ये एनडीपीएस ॲक्ट नुसार कारवाई केलेले गुन्हेगार, पाच वर्षात तडीपार करण्यात आलेले गुन्हेगार, वाहने चोरीचे सक्रिय गुन्हेगार, घरफोडी चोरीतील सक्रिय गुन्हेगार, कोयता या हत्याराचा वापर करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हेगार या प्रमाणे एकुण **२९५ गुन्हेगार चेक केले असून** त्यापैकी १२६ गुन्हेगार मिळुन आले आहेत एकुण ६८ गुन्हेगार जेलमध्ये आहेत एकुण १०१ मिळुन आले नाहीत.

युनिट-०३ कडील पो.नि. श्री. राजेंद्र मोकाशी व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी फरासखाना पो.स्टे. चे हद्दीत रविवार पेठ येथे तडीपार इसम नामे अजिंक्य सुरेश शिंदे वय-२२ वर्षे रा. लोहियानगर,पुणे यास पकडुन त्याचे **कब्जातून एक कोयता जप्त करुन मपोॲक १४२, आर्म ॲक्ट कलम ४/२५ प्रमाणे कारवाई** करुन फरासखाना पो.स्टे. चे ताब्यात देण्यात आले आहे. वारजे पो.स्टे.कडुन तडीपार करण्यात आलेला इसम नामे गग्या उर्फ विक्की विष्णु आखाडे वय-२२ वर्षे, रा. वारजे यास म्हाडा कॉलनी येथे पकडुन त्याचे **विरुध्द मपोॲ कलम १४२ प्रमाणे कारवाई** करण्यात आली आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगार सोमनाथ नवनाथ अवघडे, वय-२१ वर्षे रा. केळेवाडी, कोथरुड हा कोयत्या सारखे हत्यार कब्जात बाळगलेल्या अवस्थेत मिळुन आलेने त्याचेविरुध्द कोथरुड पो.स्टे. **आर्म ॲक्ट कलम ४/२५ प्रमाणे कारवाई** करण्यात आली आहे. सदर आरोपीविरुध्द कोथरुड पो.स्टे. कडुन सीआरपीसी कलम १५१(३) प्रमाणे करवाई करण्यात आली होती परंतु त्याने मा. न्यायालयाचे आदेशाचा भंग करुन नमुद गुन्हा केला आहे.

युनिट-०४ कडील पो.नि. श्री.बागवान व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी येरवडा पो.स्टे. चे हद्दीत लक्ष्मीनगर भागात एक इसम तलवार बाळगलेल्या अवस्थेत मिळून आलेने त्यास अटक करुन **येरवडा पो.स्टे.गुरनं.६२८/१९ आर्म ॲक्ट कलम ४/२५ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच लक्ष्मीनगर भागात तडीपार केलेला इसम नामे रविंद्र दशरथ कांबळे, वय-२५ वर्षे रा. येरवडा,पुणे मिळुन आलेने त्यांचेवर येरवडा पो.स्टे. गुरनं. ६२७/१९ **मपोकाक.१४२ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.**

युनिट-०५ कडील पो. नि. श्री. दत्ता चव्हाण व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी हडपसर पो.स्टे. चे हद्दीत एका इसमाने कोयता सारखे हत्यार बाळगले अवस्थेत मिळुन आलेने त्याचे विरुध्द हडपसर पो.स्टे. येथे आर्म **ॲक्ट कलम ४/२५, मपोॲक ३७(१)(३)/१३५ प्रमाणे गुन्हा** दाखल करण्यात आला आहे. रेकॉर्डवरील शरीराविरुध्दचा व हडपसर पो.स्टे. गुरनं.७८१/२०१९ भादंविक ३२४,५०४,५०६,३४ या गुन्हयातील **पाहिजे गुन्हेगार मिळुन आलेने** त्यास अटक करुन हडपसर पो.स्टे.चे ताब्यात देण्यात आले आहे.

खंडणी विरोधी पथक, पश्चिम चे पो. नि. श्री. राजेंद्र मोहिते व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी चंदननगर पो.स्टे. चे हद्दीत एक इसमाचे कब्जात एक कोयता मिळुन आलेने त्याचे विरुध्द **चंदननगर पो.स्टे. गुरनं.३३६/१९ आर्म ॲक्ट कलम ४/२५ प्रमाणे कारवाई** करण्यात आली आहे.

एकुण ७० लॉजेस चेक करण्यात आले आहेत. त्यापैकी **निधी लॉज, हडपसर,अश्विनी लॉज, कात्रज, न्यु रॉयल लॉज, कोंढवा, हॉटेल राज पॅलेस, कोंढवा, हॉटेल गारवा, कोंढवा यांचेवर रजिस्टर अदयावत न ठेवल्याने भादंविक १८८ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.**

सिमकार्ड विक्री करणा-या **११- दुकानदारांचे** रजिस्टर चेक करुन अदयावत ठेवणे बाबत सुचना देण्यात आल्या

पुण्यातील सुप्रसिध्द तुळशी बागेत खरेदीसाठी आलेल्या **महिलांचे पर्स चोरणा-या एक चोरटी महिला** नामे आसमा बाबू शेख हिस दामिनी पथकाने पकडुन तिचेवर कारवाई करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे श्री. अशोक मोराळे यांचे आदेशान्वये, श्री. बच्चन सिंह,पोलीस उपआयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील पो.नि. श्री. वायकर, श्री. गजाजन पवार, श्री. राजेंद्र मोकाशी, श्री. अंजुमन बागवान, श्री. दत्ता चव्हाण, श्री. राजेंद्र मोहिते, श्री. तिकोळे, श्रीमती वैशाली चांदगुडे व त्यांचे पथकातील कर्मचा-यांनी केलेली आहे.